मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » सोमवार, दिनांक १८ सप्टेंबर २०२३। पान १

# महापालिकेच्या कर संकलन विभागाचे धाडसी पाऊल!

## शहरातील मालमत्तांचे सर्वेक्षण सुरू; मालमत्तांना युपीक आयडी देण्यास सुरुवात

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पिंपरी- चिंचवड महापालिकेचा उत्पन्नाचा मुख्य स्रोत हा मालमत्ता कर आहे. त्यामुळे पालिकेच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मालमत्तांचे सर्वेक्षण करण्याचे अत्यंत महत्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या सर्वेक्षणात नवीन मालमत्ता, वापरात बदल, वाढीव बांधकाम शोधण्यात येणार आहे. तसेच या सर्वेक्षणात मालमत्तांना युपीक आयडी (युनिक प्रॉपर्टी आयडेंटिफिकेशन कोड म्हणजेच विशिष्ट मालमत्ता क्रमांक) देण्यात येत असल्याची माहिती कर संकलन व कर आकारणी विभागाचे सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली. महापालिकेच्या सर्व सेवा तसेच शासनाचे इतर विभाग यांच्यात समन्वय राहण्यासाठी या युपिक आयडीचा वापर केला जाणार आहे. सध्या देशात व्यक्तीचा जसा आधार क्रमांक हा युपिक आयडी म्हणून वापरला जातो, तसाच आता मालमत्तांसाठी युपिक आयडी वापरला जाणार आहे. त्यामुळे मालमत्तेची सर्व माहिती व मालमत्तेशी निगडित सर्व सेवा एकाच क्लिकवर उपलब्ध होणार आहेत. नागरिकांची ऊर्जा, वेळ आणि पैशात बचत होणार आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत सध्या ६ लाख ७ हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. शहरातील मालमत्तांना, जमिनींना कर लावणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. कर कक्षेत असलेले करदाते प्रामाणिकपणे कर भरतात. ज्या मालमत्ता कराच्या कक्षेत नाहीत, त्यांना कर कक्षेत आणणे हे सर्वांना समान न्याय देण्याच्या दृष्टीने न्यायसंगत आहे. त्यामुळे शहरात सर्वंकष मालमत्ता सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे. आत्तापर्यंत शहरातील सतरा झोनपैकी वाकड,



पिंपरी नगर आणि भोसरी झोनमध्ये मालमत्तांना क्रमांक देण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच थेरगाव, पिंपरी वाघेरे आणि चिखली भागात मालमत्तांना क्रमांक देण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या सर्वेक्षणासाठी स्थापत्य कन्सल्टंट एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. एजन्सी बरोबरच पालिका कर्मचाऱ्यांचा सर्वेक्षणात सहभाग आहे. या सर्वेक्षणात शहरातील प्रत्येक मालमत्तेला युपीक आयडी (युनिक प्रॉपर्टी आयडेफिकेशन कोड) देण्यात येत आहे. तसेच महापालिकेच्या सर्व सेवा आणि एकत्रित महसूल मिळण्यासाठी या युपीक आयडीचा वापर होणार आहे. हा आयडी कोड देताना मालमत्ता अथवा एकही जागा वगळली जाणार नाही. हे करतानाच मालमत्तांना अचूक आणि ओळीने क्रमांक देण्यात येत आहेत. तसेच अचूक पत्ता, अचूक मोजमापे, मालमत्तांचे फोटो, नकाशे इत्यादी नागरिकांना जाग्यावरच दिले जाणार आहेत. शहरात १७ झोन आहेत. नागरिकांना आपला झोन कोणता हे लक्षात रहात नव्हते. त्यामुळे यामध्ये महत्वाचा बदल करण्यात आला असून वाकडाला डब्ल्यूकेडी, भोसरीला बीएसआर असा

> महापालिकेचे उत्पन्न वाढीसाठी हे सर्वेक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारच्या १५ व्या वित्त आयोगाचे अनुदान मिळण्यासाठी विविध अटी, शर्ती टाकल्या आहेत. या अटींचे महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने पालन केले जात आहे. याचाच एक भाग म्हणून हे सर्वेक्षण हाती घेण्यात आले आहे.
>
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक
> पिंपरी-चिंचवड महापालिका

बदल करण्यात आला आहे. त्यामुळे हे मालमत्ता धारकांच्या लक्षात राहणे सोपे झाले आहे. पहिली तीन अक्षरे झोनच्या नावाची आद्याक्षरे म्हणजे (वाकडला डब्ल्यूकेडी, भोसरीला बीएसआर, आकुर्डी एकेडी, थेरगाव टीआरजी), दोन आकडे गटाचे, दोन आकडे ब्लॉकचे, दोन आकडी इमारत क्रमांक आणि शेवटी फ्लॅट किंवा मालमत्ता तीन आकडी क्रमांक असणार आहे. तसेच सर्व पर्यायांमध्ये प्रॉपर्टी कोड किंवा मोबाईल नंबर येईल. बांधकाम व्यावसायिक फ्लॅटचा जास्त कारपेट एरिया सांगतात. मात्र आमचा फ्लॅट कमी असून जास्त कर लागल्याच्या ओरड मालमत्ता धारक करत असतात. मात्र, या सर्वेक्षणात फ्लॅटचे अंतर्गत मोजमाप करण्यात येणार आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांना आपला फ्लॅट किती कारपेटचा आहे, काही तफावत आहे का? हेही नागरिकांना तपासता येणार आहे. त्यामुळे नागरिकांसाठी आपल्या फ्लॅटचा अचूक कारपेट तपासण्याची मोठी संधी आहे. तपासणी नंतर मालमत्ता धारकांला 'ऑन दी स्पॉट प्रिंट' मिळणार आहे.

# हत्या प्रकरणी सहा महिन्यांनी आरोपींचा शोध लावण्यात पोलिसांना यश!

## जखमी मित्राला नाशिक फाटा पुलावरून ढकलून केली होती हत्या!

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
मद्यपान करत असताना पत्नीबाबत अश्लील शब्द वापरल्याने मित्राची नाशिक फाटा येथील पुलावरून ढकलून देऊन हत्या केली आहे. या घटनेमुळे पिंपरी-चिंचवड शहरात एकच खळबळ उडाली आहे. याप्रकरणी वाकड पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. सिद्धांत रतन पाचपिंडे आणि प्रतीक रमेश सरवदे अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून दिनेश



दशरथ कांबळे असं हत्या करण्यात आलेल्या तरुणाचे नाव आहे. दिनेश हा गेल्या सहा महिन्यापासून बेपत्ता होता. त्याच्या आईने वाकड पोलीस ठाण्यात बेपत्ता असल्याची तक्रार दिली होती. त्यानंतर या हत्येचे गूढ उलगडले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनेश दशरथ कांबळे हा सहा महिन्यापासून बेपत्ता असल्याची तक्रार आई माया दशरथ कांबळे यांनी नुकतीच वाकड पोलीस ठाण्यात दिली होती. दिनेश हा नेहमीच घराच्या बाहेर जायचा. दहा ते पंधरा दिवस तो घरी परतत नसायचा. वडिलांची सोन्याची चैन घेऊन तो घरातून बाहेर पडला होता. त्यामुळे त्याची आई त्याच्यावर संतापली देखील होती. सोन्याची चैन परत घेऊन येतो म्हणून तो घरातून बाहेर पडला आणि तो घरी परतलाच नाही. तो परत येईल या अपेक्षेने आई- वडिलांनी तो बेपत्ता झाल्याची उशिरा तक्रार दिल्याचं पोलीस तपासात समोर आलं. वाकड पोलिसांनी मित्राकडे चौकशी केली असता दिनेश दशरथ कांबळे हा १५ मार्च २०२३ मध्ये आरोपी मित्र सिद्धांत आणि प्रतीक यांच्यासोबत काळेवाडी येथील मैदानावर मद्यपान करण्यासाठी बसले होते. दिनेश ने मद्यपाणाच्या नशेमध्ये प्रतीक रमेश सरवदे याच्या पत्नीबद्दल अश्लील भाषा वापरली याच रागातून दिनेशच्या डोक्यात सिमेंटचा गट्टू घालून जखमी केले. यानंतर जखमी असलेल्या दिनेशला दोघांनी मोपेड दुचाकीवरून पुणे- मुंबई जुन्या महामार्गावरील नाशिक फाटा येथे आणून पुलावरून थेट पुणे- मुंबई जुन्या महामार्गावर फेकून दिले. यात त्याचा जागीच मृत्यू झाला. अनेक वाहन त्याच्या अंगावरून गेली. अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. अखेर सहा महिन्यांनी आरोपींचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश जवादवाड यांच्या टीम ने केली आहे.

# ग्वांगझू अवॉर्डच्या शहरी इनोव्हेशन फायनलिस्टमध्ये पिंपरी चिंचवडचा समावेश!

## भारतीय शहरांमधून एकमेव पिंपरी चिंचवड शहराचा समावेश

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
६ व्या ग्वांगझू इंटरनॅशनल अवॉर्ड फॉर अर्बन इनोव्हेशन (ग्वांगझू अवॉर्ड) च्या १५ अंतिम शहरांच्या यादीत पिंपरी चिंचवड शहराचा समावेश करण्यात आला आहे. ग्वांगझू अवॉर्ड साठी भारतीय शहरांमधून पिंपरी चिंचवड हे एकमेव शहर ठरले आहे, अशी माहिती आयुक्त शेखर सिंह यांनी दिली आहे. सन २०१२ पासून सिटी ऑफ ग्वांगझू, युसीएलजी आणि मेट्रोपोलिसद्वारे सह-प्रायोजित शहरी नवोपक्रमासाठी ग्वांगझू इंटरनॅशनल अवॉर्ड देण्यात येत आहे. ज्ञान निर्मितीला चालना देण्यासाठी आणि शहरी नावीन्यतेमध्ये शिक्षण सुलभ करण्यासाठी जागतिक व्यासपीठ म्हणून ही संकल्पना उदयास आली आहे. गेल्या पाच टप्प्यांमधून जगभरात १३०० हून अधिक उपक्रम सादर करण्यात आले आहेत. परिवर्तनशील शहरी विकास पद्धतींना यामधून प्रेरणा आणि प्रोत्साहन देण्यात येत आहे. या उपक्रमात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने देखील सहभाग नोंदविला होता. भारतातून पिंपरी चिंचवड हे एकमेव शहर आहे. तसेच, अंतल्या (तुर्किये), बोगोटा (कोलंबिया), केप टाउन (दक्षिण आफ्रिका), ग्वांगजू (कोरिया), हलांद्री (ग्रीस), इज्तापालापा (मेक्सिको), जकार्ता (इंडोनेशिया), कंपाला (युगांडा), कझान (रशिया), मॅनहाइम (जर्मनी), रामल्लाह (पॅलेस्टाईन) साओ पाउलो (ब्राझील), तेहरान (इराण) आणि झियानिंग (चीन) ही सर्व शहरे जगभरातील शहरी नवकल्पनांचे प्रतिनिधित्व करीत आहेत. ५४ देशांमधील १९३ शहरे आणि प्रदेशांमधील तब्बल २७४ उपक्रमांनी ग्वांगझू पुरस्काराच्या ६ व्या फेरीसाठी अर्ज सादर केले होते. यामध्ये पिंपरी चिंचवड शहराची निवड खूप महत्त्वाची ठरली आहे. पुरस्कार प्रक्रीयेतील सादरीकरण मूल्यांकनासाठी ११ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत ग्वांगझू लायब्ररीमध्ये आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांचा समावेश असलेली एक प्रतिष्ठित तांत्रिक समिती बोलावण्यात आली होती. समितीमार्फत शाश्वत विकास उद्दिष्टे, न्यू अर्बन अजेंडा च्या स्थानिक अंमलबजावणीच्या पाठपुराव्याशी संबंधित बाबींची पडताळणी करण्यात आली. यामध्ये, निवड प्रक्रिया, नवकल्पना, परिणामकारकता, संदर्भ आणि प्रतिकृती यासारख्या निकषांची करण्यात आला होता. यातून निवड झालेल्या ४५ पात्र उपक्रमांपैकी अंतिम १५ शहरांमध्ये पिंपरी चिंचवडचा समावेश करण्यात आला आहे.




**“या यशाबद्दल अभिमान व्यक्त करताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले की, आंतरराष्ट्रीय स्तरावरील मिळालेले हे यश पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी ही एक गौरवाची बाब आहे. पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचा सहभाग हे नाविन्यपूर्ण शहरी उपायांबद्दलचे समर्पण प्रतिबिंबित दर्शविते. आमचे अनुभव जगासोबत मांडण्यासाठी आम्ही कटीबध्द असून त्याचा सन्मान होणे आवश्यक आहे. विकास आणि शहराची प्रगती पुढे नेण्यासाठी वचनबध्द असल्याचे त्यांनी सांगितले.**
**-शेखर सिंह, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त**

# छत्रपती शिवाजी महाराजांना अनोखी मानवंदना!

## दीड हजार ढोल ताशा वादकांनी एकत्र केले वादन

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**
छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे हे ३५० वे वर्ष असून यानिमित्त महाराष्ट्रासह अवघ्या देशभरात वेगवेगळे कार्यक्रम घेतले जात आहेत. पिंपरी- चिंचवडमधील भक्तीशक्ती या ठिकाणी पिंपरी-चिंचवडमधील शिवप्रेमींनी एकत्र येऊन अनोख्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना दिली. भक्तीशक्ती या ठिकाणी ५५ ढोल पथके, दीड हजार वादक, साडेचारशे ताशांचे वादन करत ३५१ भगव्या ध्वजाद्वारे मानवंदना दिली. यावेळी हे अनोखे वादन पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. पिंपरी- चिंचवडच्या भक्तीशक्ती चौक या ठिकाणी हजारो ढोल एकत्र आल्याने अवघा चौक दुमदुमून निघाला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या साडेतीनशेव्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवडमधील शिवभक्तांनी एकत्र येऊन अनोखी संकल्पना राबवली. शहरातील विविध ५५ ढोल पथके एकत्र आले यामध्ये दीड हजाराहून अधिक वादकांनी ढोल ताशाचा वादन केलं. यामध्ये साडेचारशे ताशा, पंधराशे वादक, ५५ ढोल पथके आणि ३५१ ध्वज होते. या ध्वजाद्वारे अनोख्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना देण्यात आली. भक्ती शक्तीच्या शिल्पाला ध्वजाने प्रदक्षिणा घालून मानवंदना देऊन ढोल वादनाला सुरुवात केली. यावेळी अवघा परिसर ढोल वादनाने दुमदुमून निघाला. हजारो नागरिक हे दृश्य बघण्यासाठी रस्त्यावर थांबले होते. त्यांनी हा अनोखा क्षण आपल्या मोबाईलमध्ये टिपल्याचं बघायला मिळालं.



### ३५१ भगव्या ध्वजाद्वारे मानवंदना

**» पिंपरी- चिंचवडमधील भक्तीशक्ती या ठिकाणी पिंपरी-चिंचवडमधील शिवप्रेमींनी एकत्र येऊन अनोख्या पद्धतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना मानवंदना दिली. भक्तीशक्ती या ठिकाणी ५५ ढोल पथके, दीड हजार वादक, साडेचारशे ताशांचे वादन करत ३५१ भगव्या ध्वजाद्वारे मानवंदना दिली. यावेळी हे अनोखे वादन पाहण्यासाठी हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. पिंपरी- चिंचवडच्या भक्तीशक्ती चौक या ठिकाणी हजारो ढोल एकत्र आल्याने अवघा चौक दुमदुमून निघाला.**

# राज्यात महिलांवरील अत्याचारात वाढ!

## मुंबई पहिल्या तर पुणे दुसऱ्या स्थानावर

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राज्यात महिलासंदर्भातील गुन्हे सातत्याने नोंदवल्या जात असून महिलांवर बलात्कार, विनयभंग, अपहरण आणि कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. राज्यात महिला-तरुणींचा विनयभंग आणि छेडखानीचे सर्वाधिक गुन्हे मुंबईत नोंदवले गेले असून त्या पाठोपाठ पुणे आणि नागपूर शहराचा क्रमांक आहे. त्यामुळे राज्यात महिला सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. ही धक्कादायक आकडेवारी महाराष्ट्र पोलिसांच्या संकेतस्थळावरून समोर आली आहे. शिंदे-फडणवीस-पवार सरकारने महिला सुरक्षेला प्राधान्य देण्याचा दावा केला होता. परंतु, राज्यातील महिलांवरील वाढते लैंगिक अत्याचार आणि विनयभंग, छेडखानीच्या घटना लक्षात घेता सरकारचा दावा फोल ठरत आहे. मुंबईत अन्य जिल्ह्यांच्या तुलनेत महिलांच्या विनयभंगाच्या गुन्ह्यांत चौपट वाढ झाली आहे. गेल्या आठ महिन्यांत राज्यात मुंबईत विनयभंग, छेडखानीच्या १ हजार २५४ घटना घडल्या आहेत. अन्य शहरांच्या तुलनेत हे प्रमाण चारपटीने जास्त आहे. याच कालावधीत ५४९ महिला-तरुणींवर बलात्कार झाल्याच्या गुन्ह्याची नोंद मुंबई पोलिसांनी केली आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचार, हुंडाबळीसारख्या गुन्ह्याच्या घटनांमध्येसुद्धा दुप्पट वाढ झाली आहे. पुण्यात छेडखानी केल्याच्या ३६४ घटना घडल्या आहेत, तर १२४ महिलांवर बलात्काराचे केल्याचे गुन्हे दाखल आहेत. मुंबईनंतर राज्यात पुण्यात सर्वाधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. गृहमंत्र्यांचे शहर नागपुरातही महिला सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे समोर आले आहे. गेल्या आठ महिन्यांत ३०४ तरुणी-महिलांच्या छेडखानीच्या घटना घडल्या आहेत. तर १६५ महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. तीनेशवर मुली आणि तरुणींना फूस लावून किंवा वेगवेगळी आमिषे दाखवून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत.




### पुण्यात छेडखानीच्या ३६४ घटना

» पुण्यात छेडखानी केल्याच्या ३६४ घटना घडल्या आहेत, तर १२४ महिलांवर बलात्काराचे केल्याचे गुन्हे दाखल आहेत. मुंबईनंतर राज्यात पुण्यात सर्वाधिक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचे उघडकीस आले आहे. गृहमंत्र्यांचे शहर नागपुरातही महिला सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे समोर आले आहे. गेल्या आठ महिन्यांत ३०४ तरुणी-महिलांच्या छेडखानीच्या घटना घडल्या आहेत. तर १६५ महिलांवर बलात्काराच्या घटना घडल्या आहेत. तीनेशवर मुली आणि तरुणींना फूस लावून किंवा वेगवेगळी आमिषे दाखवून पळवून नेल्याच्या घटना घडल्या आहेत.

विनयभंग, शेरेबाजी किंवा छेडखानीच्या गुन्ह्यातील पीडितांमध्ये शाळकरी आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. टवाळखोर आणि टारगट युवकांचा विनयभंगाच्या आरोपींमध्ये मोठ्या संख्येने समावेश आहे. तसेच नातेवाईक आणि कुटुंबातील सदस्यांवरही विनयभंगाचे गुन्हे दाखल झाले आहेत. पोलीस ठाण्यात आलेल्या विनयभंगाच्या तक्रारी पोलीस दाखलच करतात असे नाही. समाजात बदनामी होण्याची भीती दाखवून पोलीस गुन्हा दाखल करण्यापासून तरुणींना परावृत्त करतात. अनेकदा असे गुन्हे दाखल करण्यास पोलीस टाळाटाळ करतात, अशी माहिती समोर आली आहे.

# विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन स्वीकारणे गरजेचा!

## शिक्षकांनी आपली मानसिकता बदलावी: डॉ. देशमुख

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी राज्यातील शालेय स्तरावर करण्यासाठी सर्व शिक्षकांना आपली मानसिकता आमूलाग्र बदलावी लागणार आहे. अनुभवाधारित, प्रयोगशील, नवकल्पनांसाठी स्वागतार्ह आणि पूर्णपणे विद्यार्थीकेंद्री असा दृष्टीकोन स्वीकारणे आवश्यक आहे. संशोधकीय मानसिकता, हा त्याचा गाभा असेल,असे प्रतिपादन ज्येष्ठ शिक्षणतज्ञ डॉ. अ. ल. देशमुख यांनी केले. 'विज्ञान भारती' पुणेतर्फे फर्ग्युसन कॉलेजच्या सहकार्याने 'इनोव्हेटीव्ह टिचिंग मेथोडॉलॉजी विथ एनईपी परस्पेक्टिव्ह' या विषयावर एक दिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. डॉ. देशमुख यांच्या बीजभाषणाने कार्यशाळेचे उद्घाटन झाले. प्रसंगी फर्ग्युसन महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. स्वाती जोगळेकर, विज्ञानभारतीचे पश्चिम क्षेत्र संघटनमंत्री श्रीप्रसाद, मुंबई येथील भाभा अणु संशोधन केंद्रातील अणु उर्जा विभाग विज्ञान संशोधन सहयोग संकुलचे अभियंता डॉ. जयंत जोशी, विज्ञान भारतीचे श्रीकांत कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यशाळेला विविध शाळांमधील ७५ पेक्षा अधिक अध्यापकांची उपस्थिती होती. नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अद्याप राज्यातील शालेय शिक्षण स्तरावर लागू झालेले नाही, हे स्पष्ट करून डॉ. देशमुख म्हणाले, नव्या धोरणाच्या अंमलबजावणीत सुमारे ३० टक्के वाटा त्या त्या राज्याचा असेल. शिक्षणाचा आणि अध्यापनाचा बहुशाखीय दृष्टीकोण, अध्यापनातील आणि अभ्यासविषय निवडण्यातील लवचिकता, संशोधक वृत्ती घडवण्यावर भर, बहुभाषिकत्व, उपयोजित शिक्षणाचा पर्याय, अनुभवात्मक शिक्षण, स्कूल कॉम्प्लेक्स योजना आणि क्लब सिस्टीम, हे नव्या शैक्षणिक धोरणातील कळीचे मुद्दे आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या शिक्षकांची भूमिका आणि मानसिकता तयार करणे गरजेचे आहे. अशा कार्यशाळांच्या माध्यमातून ही गरज पूर्ण करण्याचे प्रयत्न स्वागतार्ह आहेत.विज्ञानभारतीच्या पश्चिम महाराष्ट्र सचिव डॉ. मानसी माळगावकर यांनी सूत्रसंचालन केले. अभिषेक कुलकर्णी यांनी परिचय करून दिला. श्रीप्रसाद आणि वैशाली कामत यांनी विज्ञान भारतीच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. डॉ. स्वाती जोगळेकर यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. सर्व सहभागींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.




# पीएमपीची माफक दरात प्रासंगिक करार!




**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पीएमपीच्या वतीने माफक दरात प्रासंगिक करार बससेवा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. नागरिक, शाळा, महाविद्यालये यांच्या मागणीनुसार ही सेवा देण्यात येणार आहे. नैसर्गिक इंधनावर (सीएनजी) धावणाऱ्या आणि वीजेवर धावणाऱ्या (इलेक्ट्रिकल बस- ई-बस) प्रासंगिक करारासाठी देण्यात येणार आहेत, अशी माहिती पीएमपीच्या वाहतूक व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. सोमवार ते शनिवार या कालावधीत आठ तासांसाठी सीएनजीवरील गाड्या ८ हजार ४६९ रुपये तर ई-बस ९ हजार ९५१ रुपये दराने दिल्या जाणार आहेत. सोळा तासांसाठी सीएनजी गाडीचा दर १६ हजार ९४० तर ई-बसचा दर १९ हजार ९०३ रुपये असा असेल. यामध्ये वस्तू आणि सेवा कराचा समावेश करण्यात आला आहे. प्रस्तावित दराच्या ५० टक्के या प्रमाणे सोडणे आणि आणणे या एकेरी खेपेसाठी वस्तू आणि सेवाकरासह सीएनजीसाठी १ हजार २३४ तर ई-बससाठी ४ हजार ९७५ रुपये आकारले जाणार आहेत.

# श्रीनगर मध्ये बसणार पुण्यातील बाप्पा!

## सीमेवरील जवानांसाठी वंदे मातरम संघटनेकडून खास भेट



### देशात शांतता सैन्यदलामुलेच टिकून

» वंदे मातरम संघटने कार्याध्यक्ष सचिन जामगे म्हणाले, बाहेरील शत्रूला नामोहरम करण्यासाठी आपले जवान हे नेहमीच सज्ञ असतात. देशात शांतता ही सैन्यदलामुलेच टिकून आहे. सैन्यातील प्रत्येक सैनिक दक्ष असल्याने आपल्याला सन, उत्सव, आनंदाने साजरे करता येतात. म्हणूनच यावर्षी देखील नेहमीप्रमाणे आम्ही सैनिकांना गणेशोत्सवाच्या पूर्वीच दिवाळीचा फराळ घेवून आलो आहोत. सैनिक हे सीमेवर प्राणांची आहुती देण्यासाठी कायम सज्ञ असतात.

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** भारतीय सैन्य हे सीमेवर नेहमीच तत्पर असते. सातत्याने कर्तव्यावर असणाऱ्या जवानांना घरातील सन, उत्सव यांपासून नेहमीच दूर राहावे लागते. परंतू त्यांना देखील हे सन उत्सव साजरे करावेसे वाटतात, हाच धागा पकडून वंदेमातरम् संघटना, युवा फिनिक्स सोसायटी व सरहद संस्थेच्या वतीने काश्मीर मधील जावानांची खास भेट घेवून त्यांना दिवाळी फराळाचे वाटप तसेच गणपतीबाप्पाची मूर्ती आणि शंकर महाराज यांची प्रतिकृती भेट स्वरूपात देण्यात आली. यावेळी वंदे मातरम् संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष सचिन जामगे, प्रदेशाध्यक्ष वैभव वाघ, पुणे शहर विद्यार्थी कार्याध्यक्ष अमोल जगताप, संपर्कप्रमुख प्रसाद कुलकर्णी, तसेच स्थानिक बांधव उपस्थित होते. यावेळी बोलताना वंदे मातरम संघटनेचे कार्याध्यक्ष सचिन जामगे म्हणाले, बाहेरील शत्रूला नामोहरम करण्यासाठी आपले जवान हे नेहमीच सज्ज असतात. देशात शांतता ही सैन्यदलामुलेच टिकून आहे. सैन्यातील प्रत्येक सैनिक दक्ष असल्याने आपल्याला सन, उत्सव, आनंदाने साजरे करता येतात. म्हणूनच यावर्षी देखील नेहमीप्रमाणे आम्ही सैनिकांना गणेशोत्सवाच्या पूर्वीच दिवाळीचा फराळ घेवून आलो आहोत. सैनिक हे सीमेवर प्राणांची आहुती देण्यासाठी कायम सज्ज असतात. त्यामुळे त्यांना एक विशेष मान आहे. त्यांच्यामुळेच भारतामध्ये शांती नांदत आहे, अशा वीर जवानांच्या सोबत आम्ही खंबीरपणे उभे आहोत, हे त्यांना दाखविण्यासाठी आम्ही, या उपक्रमाचे आयोजन केले होते, असे वंदे मातरम संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वैभव वाघ यांनी बोलताना सांगितले. श्रीनगर श्रीनगर येथील हरीसिंग रस्त्यावर असणाऱ्या लाल चौकातील मंदिरात दीड दिवसाच्या बाप्पाची स्थापना येथील मराठी बांधवांच्या वतीने करण्यात येते. गेल्या २० वर्षापासून ही परंपरा येथील मराठी बांधवांनी जपली आहे. पुण्यातील गणेशोत्सवाला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता आहे. यामुळे यावर्षी पुण्यातील गणपतीबाप्पाची मूर्ती यावेळी भेट देण्यात आली. या मूर्तीची स्थापना मराठी बांधवांच्या वतीने करण्यात येणार आहे.

# भारतात श्रवण यंत्रांची मोठया प्रमाणात गरज!

## २२० हून अधिक रुग्णांना श्रवण यंत्राचे वाटप



### कर्णबधिर दिना निमित्ताने उपक्रम

» अनुराधा पौडवाल म्हणाल्या, लहान मुलांना ऐकायला येत नाही, हे पालकांना लवकर कळत नाही. त्यामुळे याविषयी जनजागृती करण्याकरिता जागतिक कर्णबधिर दिनाच्या निमित्ताने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. जी मुले आर्थिकदृष्टया दुर्बळ आहेत, त्यांना विनामूल्य श्रवणयंत्र दिले जात आहे. मुलांना ऐकायला येत नसेल तर ती केवळ ऐकू शकत नाहीत, असे नाही तर यामुळे अनेक मुले बोलायला देखील शिकत नाहीत. त्यामुळे याकडे लक्ष देऊन श्रवणयंत्र विनामूल्य उपलब्ध करुन देण्याकरिता दानशूरांनी पुढे यायला हवे.

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

आपल्याकडे लहान मुलांनी ऐकू न येणे किंवा बोलता न येणे यामुळे ते हतबल होऊ नये, हीच प्रार्थना आमची गणराया चरणी आहे. मुलांना ऐकायला येत नसेल, तर त्याचे कारण पालकांनी शोधणे गरजेचे आहे. तसेच मूल जन्माला आल्यानंतर इतर तपासण्यांसोबतच श्रवण तपासणी देखील गरजेची आहे. एकीकडे जागतिक कर्णबधीर दिन साजरा होत असतानाच दुसरीकडे भारतात श्रवणयंत्रांची मोठ्या प्रमाणात गरज असल्याचे प्रख्यात गायिका पद्मश्री डॉ. अनुराधा पौडवाल यांनी सांगितले. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आणि सूर्योदय फाऊंडेशन, मुंबई आणि ओएनजीसी कंपनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन मराठी शाळेत झालेल्या कार्यक्रमात तब्बल २२० हून अधिक रुग्णांना श्रवण यंत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी ओएनजीसी कंपनीचे चिफ जनरल मॅनेजर एन.सी.बलियारसिंग, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या ज्येष्ठ शिक्षीका तनुजा तिकोने, प्रतिभा पाखरे, भाग्यश्री हजारे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, डॉ.संजीव डोळे, राजाभाऊ घोडके, विलास रासकर, ज्ञानेश्वर रासने, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ पायमोडे आदी उपस्थित होते. अनुराधा पौडवाल म्हणाल्या, लहान मुलांना ऐकायला येत नाही, हे पालकांना लवकर कळत नाही. त्यामुळे याविषयी जनजागृती करण्याकरिता जागतिक कर्णबधिर दिनाच्या निमित्ताने हा उपक्रम राबविण्यात आला आहे. जी मुले आर्थिकदृष्टया दुर्बळ आहेत, त्यांना विनामूल्य श्रवणयंत्र दिले जात आहे. मुलांना ऐकायला येत नसेल तर ती केवळ ऐकू शकत नाहीत, असे नाही तर यामुळे अनेक मुले बोलायला देखील शिकत नाहीत. त्यामुळे याकडे लक्ष देऊन श्रवणयंत्र विनामूल्य उपलब्ध करुन देण्याकरिता दानशूरांनी पुढे यायला हवे. महेश सूर्यवंशी म्हणाले, दगडूशेठ गणपती ट्रस्ट व सूर्योदय फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम होत आहे. ट्रस्टच्या कार्यालयात ८०० हून अधिक रुग्णांची नोंदणी झाली असून अजूनही नोंदणी सुरु आहे. सूर्योदय फाऊंडेशनच्या माध्यमातून गायिका अनुराधा पौडवाल याविषयी जनजागृती करीत आहेत, हे खूप मोठे काम आहे. केवळ पुण्यातच नाही, तर इतरही शहरात या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळत आहे. यावरुनच समाजातील मोठी व्यथा समोर येत असल्याचे दिसून आले आहे. आजच्या शिबीरात या मुलांना यंत्रा सोबत ८ ते ९ महिने पुरतील इतके सेल देखील दिले जात आहेत. अनुराधा पौडवाल यांच्या पुढाकाराने दर दोन ते तीन महिन्यांनी अशीच शिबीरे आयोजित करुन मदत केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.